महाराष्ट्र शासन
**जिल्हा माहिती कार्यालय, भंडारा** ०७१८४-२५२२५७
यशकथा क्र :- ६ E-mail-dio.bhandara@gmail.com दि. १९.९. २०१६

## जलयुक्त शिवारांतर्गत एक यशस्वी प्रयोग....
## नाला खोलीकरण शेतकऱ्यांसाठी जलसंजीवनी

**जिल्हयातील** तुमसर तालुक्यातील गावं दावेझरी तालुक्यापासून १३ किलोमीटर अंतरावर वसलेलं केवळ १ हजार २१९ लोकसंख्या असलेलं. या गावातील मुख्य व्यवसाय शेती, खरीप हंगामात भात व बांधावर तूर पिके घेतली जातात. रब्बी हंगामात गहू, लाखोरी, हरभरा पिकाची लागवड केली जाते. दावेझरी येथील तुकाराम शहारे, रामदास वाहणे, पृथ्वीराज कटरे यांच्याकडे ०.८० हेक्टर आर कोरडवाहू शेती असून पावसाच्या पाण्यावर भात व तूर पिके घेतल्या जात होती. परंतु त्यांची शेती पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे एखादया वर्षी पाऊस कमी झाला तर भाताचं पिक लागवड करणे शक्य होत नव्हतं. त्यामुळे त्यांना नेहमी दुष्काळजन्य परिस्थितीला नेहमीच तोंड दयावं लागत असे, अशा परिस्थितीमध्ये त्यांना कर्ज काढून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागत असे.

दावेझरी पाणलोट समितीमध्ये एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत एन.आर.एम. मध्ये मजगी, पुनरुज्जीवन व जलयुक्त शिवार अभियानांतर्गत नाला खोलीकरण, तुटफुट दुरुस्ती या कामाची निवड करण्यात आली. त्यामध्ये प्रकल्पाच्या माध्यमातून ३ शेततळे व ८.२५ हेक्टर आर क्षेत्रावर उपचारामध्ये मजगी पुनरुज्जीवन २९.१३ हेक्टर आर करण्यात आले. चालू वर्षात पावसाचे पाणी तुरळक प्रमाणात असल्यामुळे येथील शेतकऱ्यांनी वसुंधरा एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन व जलयुक्त शिवार अभियानांतर्गत तयार करण्यात आलेल्या नाला खोलीकरण केल्यामुळे साठलेल्या पाण्याचा उपयोग करुन धान रोवणी करीता शेतात पाणी सोडण्यास सुरुवात केली आणि पाहता पाहता सात ते आठ हेक्टर शेतीचे ओलित करुन धानाची लागवड केली.

या नालाखोलीकरणाचे वैशिष्टय म्हणजे पहिल्या पाऊसात नाल्याचे पात्र पुर्ण भरले. त्यामुळे शेतकऱ्यांनी नर्सरी लवकर तयार करुन हंगामात पाऊसात खंड पडून देखील शेतालगतच्या नाला खोलीकरण तसेच जुन्या सिमेंट नाला बांध दुरुस्तीमुळे पाणी संचय करुन लगतच्या शेतकऱ्यांनी इलेक्ट्रीक इंजिन व डिझेल इंजिन बसवून धान रोवणी करीता पाण्याचा उपयोग केला आहे.

...२/-

एकूणच हया बाबींचा आढावा घेतला असता शेतकरी आपल्या शेतालगत तयार करण्यात आलेल्या नाला खोलीकरणाच्या शासनाच्या निर्णयावर अत्यंत खुश आणि समाधानी आहे. पाण्याची भिषण टंचाई असतांना सुध्दा त्यांना इतरत्र न भटकता वेळो-वेळी पाण्याची गरज भागविता आली. जलयुक्त शिवारच्या कामामुळे येथील शेतकऱ्यांचा गहू व हरभरा लागवड करण्याचा मानस आहे. यामाध्यमातून आपले आर्थिक स्तर उंचावण्यासाठी ते प्रयत्नशिल आहेत. अशा प्रकारे तुकाराम शहारे, रामदास वाहणे, पृथ्वीराज कटरे व इतर ६ शेतकऱ्यांना जलयुक्त शिवारांतर्गत ***नाला खोलीकरण जणू जल संजीवनीच*** ठरली आहे.

**या नालाखोलीकरणावर २ लाख ४५ हजार ५१७ इतका निधी खर्च करण्यात आला असून सरासरी ३२० मीटर लांबीचे नालाखोलीकरण करण्यात आले आहे. याचा वापर भात पिकाला पाणी देण्यासाठी करण्यात येत असून त्यामुळे या शेतकऱ्यांना आता पावसाच्या पाण्याअभावी पिक जाण्याची भिती राहिली नाही.**

**■ बी.एम. समरीत, कृषी सहाय्यक, सिहोरा, ता. तुमसर**

**■ रवी गिते,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**भंडारा**

००००० 